## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी संस्थेतील सात विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीमध्ये निवड झाली असून कुलगुरू प्रा  व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते त्यांना आज नियुक्तीपत्रे देण्यात आली.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाअंतर्गत युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथे बी. टेक केमिकल इंजिनिअरिंग च्या विद्यार्थ्यांसाठी कुमार मेटल इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई व सुप्रीम पेट्रोकेम लि. रायगड या कंपन्यांतर्फे परिसर मुलाखतीचे युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील सेमिनार हॉल येथे आयोजन करण्यात आले होते.

या परिसर मुलाखतीतून कुमार मेटल इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड, मुंबई या कंपनीत निकिता चौधरी आणि निकिता कोळी या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे. तर सुप्रीम पेट्रोकेम. लिमिटेड, रायगड या कंपनीत प्रसाद ठाकूर, प्रशांत पाटील, राम साखरे आणि जयेश पाटील यांच्यासह प्लास्टिक टेक्नॉलॉजीच्या अमित कोळी अशा एकूण ७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

आज निवड झलेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरूंच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आली असून यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील,अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, संस्थेचे संचालक प्रा. अजयगीरी गोस्वामी, कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील, प्रा.राजकुमार सिरसाम, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा हे उपस्थित होते.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २६ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता अनुकुल शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करीत विद्यार्थी वर्गात उपस्थित राहण्याकरीता उत्तम शैक्षणिक तंत्रे विकसित करावी. विद्यार्थ्यांमधील अभ्यासासोबत स्पर्धापरीक्षा व इतर कला गुणांना वाव मिळण्यासाठी सुविधा निर्माण कराव्यात, विद्यापीठाच्या योजनांची विद्यार्थ्यांना माहिती द्यावी, विद्यार्थ्यांशी सतत संवाद ठेवावा असे आवाहनात्मक पत्र कुलगुरु व्ही.एल.माहेश्वरी यांनी आज दि. २६ जुन रोजी विद्यापीठाशी संलग्नीत असणाऱ्या विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविले आहे.

कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी पत्रात नमुद केले आहे की दि. २१ जुन २०२५ पासुन नविन शैक्षणिक वर्ष सुरु झाले आहे. महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया आणि काही वर्गांच्या नियमित तासिकाही सुरु झाल्या आहेत. यंदाच्या वर्षापासुन पदवीच्या द्वितीय वर्षासाठी नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP-2020) तयार केलेला अभ्यासक्रम लागु होत आहे. त्यामुळे होणाऱ्या बदलांची माहिती विद्यार्थ्यांना देणे व त्या अनुषंगाने आवश्यक तयारी करणे ही जबाबदारी प्रत्येक महाविद्यालयाने पार पाडली असेलच. विद्यार्थ्यांचे महत्व पटवुन देतांना प्रा. माहेश्वरी यांनी काही महत्वाचे मुद्दे या पत्रातुन मांडले आहे.

त्यात महाविद्यालयातील वैयक्तीक व अभ्यासाशी संबंधीत वातावरण विद्यार्थ्यांसाठी संवादात्मक व प्रेरणादायी असावे. वर्गातील उपस्थिती वाढविण्या संदर्भात प्राचार्यांनी विशेष लक्ष केंद्रीत करावे. विद्यार्थ्यांनी नियमितपणे वर्गात यावे तासिकांना हजर रहावे. अभ्यासक्रमाशी संबंधीत आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. आविष्कार, युवारंगा यासारख्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र आणि ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेल च्या माध्यमातुन करियर घडविण्याची संधी विद्यार्थ्यांना समजवुन सांगण्याची संधी विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणाऱ्या विद्यापीठाच्या विविध योजनांची माहिती त्यांना द्यावी. शिक्षकांनी आपआपल्या विषयांमध्ये विद्यार्थी आर्कषित होतील यासाठी प्रयत्न करत शैक्षणिक पध्दतीमध्ये सुधारणा अथवा बदल करावा. तसेच प्राचार्यांनी विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी सतत संवाद साधुन त्यांच्या अडचणी समजुन घेत त्यांना मदत करावी. असे मुद्दे कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी पत्रातुन मांडले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी दक्ष राहुन त्यांच्यासोबत महाविद्याल्याच्या आणि विद्यापीठाच्या प्रगतीशिल वाटचालीस आपण सारेमिळून हातभार लावुय आणि सर्वांच्या सहभागातुन विकासाच्या दिशेने वाटचाल करत एक सकारात्मक पाऊल टाकुया. असा स्नेही संवाद कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांनी पत्राच्या माध्यमातुन सर्व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी साधला आहे. या पत्राच्या माध्यमातुन निश्चितच प्राचार्य त्यांच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मुल्याधिष्ठीत वाटचालिसाठी महत्वाचा संवाद असुन विद्यापीठ व महाविद्यालय यांचे परस्परसंबध अधिक बळकट करत नव्याशैक्षणिक पर्वाला दिशा देणारा हा एक महत्वाचा टप्पा ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**बातमी क्र. – २**

जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे उद्या दि. २७ रोजी महाराष्ट्र शासन व विविध उद्योग व्यावसायिक संस्था यांच्या समवेत १० सामंजस्य करारावर कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी होणार आहे.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.डॉ.आर.एस.माळी, प्रा.डॉ.के.बी.पाटील, अॅप्रेंटेशिप अॅम्बडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) कार्यगट महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर यांच्या समवेत प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती राहणार आहे. या समारंभाचे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभागृहात दुपारी २.३० वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन व विविध औद्योगिक व्यावसायिक संस्था, यांच्या समवेत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या जाणार आहेत.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २६ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता